**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **कापसाचं उत्पादन पुढच्या वर्षी किमान एक हजार किलो प्रति हेक्टर वाढवण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्रालय प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांचं आज नागपूरात प्रतिपादन.**
2. **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत 'महाराष्ट्राची उद्योग भरारी' कार्यक्रमाचं उद्या नागपुरात आयोजन.**
3. **राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर साकारलेल्या ऑक्सीजन बर्ड पार्कचं लोकार्पण येत्या शनिवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार.**
4. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ सुभाष चौधरी यांचं आज नागपुरात यकृताच्या आजाराने निधन.**
5. **भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्हयांसाठी आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट, नागपुरात देखील मुसळधार पावसाची हजेरी.**

****

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह

भारतामध्ये कापसाचं उत्पादन साडेचारशे किलो प्रति हेक्टर असून ते अमेरिका, रशिया, चीन, ब्राझील या देशांपेक्षा अधिक आहे. हे उत्पादन पुढच्या वर्षी किमान 1000 किलो प्रति हेक्टर वाढाववं यासाठी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी आज नागपूर इथं प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.केंद्रीय कापूस संशोधन संस्था इथं बियाणे कंपन्या शास्त्रज्ञ, जिनिंग कंपनीचे मालक तसेच संबंधित हितधारकांसोबत बैठक घेऊन अकोल्याच्या कापूस शेतीचचं प्रारूप संपूर्ण विदर्भात राबवण्याचं त्यांनी सुचविलं. सध्या अकोल्यामध्ये साडे ३ हजार हेक्टरवर हाय डेन्सिटी प्लांटेशन करून एका हेक्टर मध्ये पंधराशे ते अठराशे किलो कापसाचं उत्पादन होत आहे. पुढच्या वर्षी हे उत्पादन अकोल्यात 50 हजार हेक्टर वर घेण्याचा तसंच विदर्भातील सर्व कापूस उत्पादक क्षेत्रात हे प्रारूप राबवण्याचा आपला मानस असल्याचं गिरीराज सिंह यांनी स्पष्ट केलं. कृषि क्षेत्रा नंतर रोजगार देणारं वस्त्रोद्योग हे मोठ क्षेत्र असून 2030 पर्यंत या क्षेत्रामध्ये 6 कोटी लोकांना रोजगार देऊ असं देखील त्यांनी यावसंगी सांगितलं.

महाराष्ट्राची उद्योग भरारी

महाराष्ट्राने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयाची माहिती उद्योग जगत साकारणाऱ्या उद्योजकांना, व्यवसायिकांना व्हावी. राज्याचे व्हिजन कळावे या उद्देशानं नागपुरात उद्या हॉटेल सेंटर पॉईंट इथं सकाळी साडे १० वाजता ‘उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी’ या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या विशेष

समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार श्यामकुमार बर्वे, यांसह अनेक आमदार आणि उद्योग विभाग तसच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

अजित पवार

अमरावती शहर आणि परिसराच्या विकासासाठी भरघोस निधी देण्यात आला आहे. यातून शहराच्या वैभवात भर पडणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण होतील. आज एकाच दिवशी 1420 कोटी रूपयांच्या कामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आलं आहे. ही काम दर्जेदार होण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. अमरावती इथं जिल्हा नियोजनच्या सभागृहात आज विविध विकासकामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

ऑक्सीजन बर्ड पार्क

नागपूर- वर्धा मार्गावरील जामठा क्लोव्हर लिफ इथ उभारण्यात आलेल्या ऑक्सीजन बर्ड पार्कचं लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता करण्यात येणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पुढाकारातून नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४वर ऑक्सीजन बर्ड पार्क साकारण्यात आला आहे. १४ पूर्णांक ३२ कोटींचा हा प्रकल्प जवळपास २० एकरमध्ये साकारण्यात आला आहे. याठिकाणी केवळ पक्ष्यांसाठी विशिष्ट फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या उद्यानाचे महत्त्व केवळ प्राणवायू देणारा परिसर एवढच नसून पक्ष्यांच्या विविध प्रजातींसाठी हा परिसर आश्रयस्थान म्हणून उपयुक्त ठरणार आहे. 8,104 प्रकारच्या वनस्पतींसह 11 हेक्टर क्षेत्रफळावर ऑक्सिजन पार्क विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पात नैसर्गिक तळ्यांनाही समाविष्ट करून घेण्यात आलं आहे.

संजय राऊत-कोठडी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना शिवडी दंडाधिकारी न्यायालयानं आज १५ दिवसांची कोठडी आणि २५ हजारांचा दंड ठोठावला. मीरा भाईंदर शहरातल्या शौचालय कंत्राटावर केलेल्या विधानामुळे मेधा सोमय्या यांनी त्यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता. मीरा भाईंदर पालिका क्षेत्रातली १५४ सार्वजनिक शौचालयं बांधण्याचं कंत्राट मेधा सोमय्या यांच्या संस्थेला मिळालं होतं. मात्र, या कंत्राटात घोटाळा झाल्याचा आरोप संजय राऊत यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला होता. दरम्यान संजय राऊत यांना न्यायालयानं सशर्त जामीन मंजूर केला आहे.

डॉ.सुभाष चौधरी- निधन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी यांचं आज सकाळी नागपुरात एका खाजगी रुग्णालयात वयाच्या ५९ व्या वर्षी निधन झालं. ते यकृताच्या आजारावर उपचार घेत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. विद्यार्थी हिताला प्राधान्य देणारे मृदुभाषी कुलगुरू म्हणून ते कायम स्मरणात राहतील असं गडकरी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. डॉक्टर सुभाष चौधरी यांना शिक्षण क्षेत्राचा 34 वर्षाचा प्रदीर्घ अनुभव होता. 1987 पासून वर्धा जिल्ह्यातील सेवाग्रामच्या बी डी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग इथं 23 वर्ष ते शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मार्गदर्शनात चार विद्यार्थ्यांना पीएचडी प्रदान करण्यात आल्या, याशिवाय विद्यापीठाच्या अनेक मंडळाचे सक्रिय सदस्य होते. 8 ऑगस्ट 2020 रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची त्यांनी जबाबदारी स्वीकारली. जानेवारी 2023 मध्ये नागपूर विद्यापीठात सुभाष चौधरी यांच्या नेतृत्वात इंडियन सायन्स काँग्रेसचं यशस्वी आयोजन करण्यात आलं होतं.

बावनकुळे

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या महाराष्ट्र दौऱ्यात पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना केलेल्या मार्गदर्शनामुळे संघटनेत ऊर्जा निर्माण झाली असून आगामी निवडणुकीत महायुतीच्या विजयासाठी पक्ष संघटना जोमाने काम करेल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज व्यक्त केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषेदत बावनकुळे बोलत होते. पार्टीचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन सामान्य जनतेच्या मनात महाविकास आघाडीने खोट्या प्रचारामुळे निर्माण केलेला संभ्रम दूर करतील, त्याचबरोबर केंद्र, आणि राज्य सरकारच्या कामगिरीची माहिती देतील, असंही बावनकुळे यांनी नमूद केलं. अमित शाह यांनी 24 आणि 25 सप्टेंबर रोजी विदर्भ, मराठवाडा, पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रात संघटनात्मक बैठका घेतल्या. या दौऱ्यामध्ये जवळपास 5 हजार पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी शाह यांनी संवाद साधल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

अदिती तटकरे

पोषण जनजागृती संदर्भातील विविध उपक्रमात महाराष्ट्र देशात कायमच अव्वल राहिला असल्याचं, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल 'पोषण भी, पढाई भी' या राज्यस्तरीत परिसंवादात त्या बोलत होत्या. अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांना उत्तम पोषण, आहार आणि शिक्षण देणं हा 'पोषण भी, पढाई भी' या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय महिला आणि बालविकास राज्यमंत्री सावित्री ठाकूर यावेळी उपस्थित होत्या. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मानधन वाढीसंदर्भात राज्य शासनाने नेहमीच सकारात्मक

भूमिका घेतली असून, केंद्र शासनानेही याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती तटकरे यांनी, केंद्रीय मंत्री ठाकूर यांच्याकडे केली.

पूजा खेडकर

बडतर्फ प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरच्या अटकेपासूनचे अंतरिम संरक्षण उच्च न्यायालयानं 4 ऑक्टोबर पर्यंत वाढवलं आहे. खेडकरांच्या वकिलांनी तपशीलवार म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितल्यानंतर न्यायालयानं या प्रकरणाला स्थगिती दिली. जुलै महिन्यात युपीएससीनं त्यांची प्रोबेशनवरील उमेदवारी रद्द केली होती. खेडकर यांनी नियमांचं उल्लंघन केल्याचं निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. आयएएस (प्रोबेशनरी) नियम 1954 च्या नियम 12 अन्वये त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली होती.

माझी शाळा सुंदर शाळा

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात भंडाऱ्यातील जिल्हा परिषद प्राथमिक सोरना शाळेचा जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक आला आहे. द्वितीय क्रमांक प्राप्त शाळेला पाच लक्ष रुपयाचे बक्षीस मिळणार आहे. मागच्या वर्षी ह्या शाळेचा तुमसर तालुक्यातून प्रथम क्रमांक आला होता. त्यासाठी शाळेला 3 लक्ष रुपयाचे पारितोषिक मिळाले होते.

हवामान

हवामान खात्यानं वर्तविलेल्या अंदाजानुसार नागपूरात आज दुपार पासून मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे शहराच्या सखोल भागात पाणी साचलं असून नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्हयांमध्ये आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय नागपूरसह उर्वरित जिल्हयांमध्ये आज आणि उद्या मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्यानं येलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, राज्यात गेल्या २४ तासांत ६ जणांचा मृत्यू झाला असून २ जण जखमी तर ३ जण बेपत्ता आहेत. मुंबईत अंधेरीत पर्जन्य जलवाहिनीत कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला असून, याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.पालघर आणि नाशिक या दोन जिल्हयांना आज पावसाचा रेड अलर्ट तर मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, धुळे आणि नंदुरबार या जिल्हयांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हयातल्या जायकवाडी धरणाचा जल साठा ९९ टक्क्यांच्या वर पोहोचला असून, धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे.

*****